असा. क्र. ८० रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

बुधवार, ऑक्टोबर १, २००३/आश्विन ९, शके १९२५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग चार-अ

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ, आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ सप्टेंबर २००२.

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक आरटीआर. १०८९/४०५/सीआर-६४/औषधे-१.---भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश अधिक्रमित करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अखत्यारीमधील अन्न व औषध प्रशासनातील सह आयुक्त (औषधे) गट-अ, सहाय्यक आयुक्त, (औषधे) गट-अ आणि औषध निरीक्षक, गट-ब पदाच्या सेवाभरतीचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :---

१ या नियमांना अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांमधील सहआयुक्त (औषधे) सहाय्यक आयुक्त (औषधे) आणि औषध निरीक्षक या पदांचे (सेवा प्रवेश) नियम, २००२ असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,---

(अ) '' अधिनियम '' म्हणजे औषधे व सौंदर्य प्रसाधने अधिनियम, १९४०,

(ब) '' १९४० चा नियंत्रण अधिनियम '' म्हणजे औषधे व सौंदर्य प्रसाधने अधिनियम, १९४०,

(क) '' १९५६ चा नियंत्रण कायदा '' म्हणजे भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६, (१९५६ चा १०२),

(ड) '' आयोग '' म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोग,

(ई) '' अन्न आणि औषध प्रशासन '' म्हणजे शासनाचे अन्न व औषध प्रशासन,

(फ) '' आयुक्त '' म्हणजे आयुक्त, अन्न व औषध प्रशासन,

(ग) '' शासन '' म्हणजे महाराष्ट्र शासन.

३. अन्न व औषध प्रशासनामधील सह आयुक्त (औषधे) या पदावरील नेमणूक.............. अन्न व औषध प्रशासनातील सहाय्यक आयुक्त (औषधे) किंवा तंत्र अधिकारी (ॲलोपॅथिक) हे पद धारण करणाऱ्या, त्या पदावरील ३ वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तींमधून गुणवत्तानी ज्येष्ठतेच्या तत्वावर एखाद्या योग्य व्यक्तीस पदोन्नती देऊन करण्यात येईल.

४. अन्न आणि औषध प्रशासनामधील सहाय्यक आयुक्त (औषधे) या पदावरील नेमणुका पुढील-पैकी कोणत्याही एका मार्गाने करता येतील जसे :---

(अ) अन्न आणि औषध प्रशासनातील औषध निरीक्षक या पदावर ३ वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तींमधून गुणवत्ता नी ज्येष्ठतेच्या आधारावर एखाद्या योग्य व्यक्तीस पदोन्नती देऊन किंवा,

(ब) पुढील अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने,---

(अ) अगोदरच शासनाच्या सेवेत असलेल्या उमेदवारांखेरीज करून ज्यांचे वय ४० वर्षांपेक्षा जास्त नाही आणि,

(ब) खाली नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक अर्हता आणि अनुभव धारण करणारे :---

(एक) औषध निर्माणशास्त्र किंवा औषध निर्माणविषयक रसायनशास्त्र यातील पदवी अथवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची, वैद्यकशास्त्र किंवा सूक्ष्मजीवशास्त्र यातील विशेष प्राविण्यासह पदवी.

(दोन) वरीलप्रमाणे शैक्षणिक पात्रता संपादन केल्यानंतर औषध तयार करणे किंवा औषध तपासणी किंवा अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी यातील कमीत कमी ५ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे आणि,

(क) मराठी भाषेचे लिहिणे, वाचणे व बोलण्याचे ज्ञान असावे :

परंतु या नियमाच्या खंड (ब) च्या उप-खंड (एक) मध्ये नमूद केलेल्या विषयांपैकी कोणत्याही एका विषयाची पदव्युत्तर पदवी किंवा कायदे-विषयक पदवी किंवा सिंथेसिस आणि औषध तपासणीतील संशोधनांचा अनुभव किंवा औषध उत्पादनाचा प्रत्यक्ष अनुभव किंवा दोन्ही अनुभव असतील अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल :

आणखी असे की, उमेदवाराकडे असाधारण अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही असतील अशा उमेदवाराच्या असाधारण अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही असतील अशा उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा शिथिल करता येईल.

५. अन्न आणि औषध प्रशासनाच्या औषध निरीक्षक या पदावरील नेमणूक पुढील अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने करण्यात येईल :—

(अ) अगोदरच शासनाच्या सेवेत असलेल्या उमेदवारांखेरीज करून ज्यांचे वय ३५ वर्षांपेक्षा जास्त नाही,

(ब) औषधनिर्माणशास्त्र किंवा औषध निर्माणविषयक रसायनशास्त्र यातील पदवी अथवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची, वैद्यकशास्त्र किंवा सूक्ष्मजीवशास्त्र यातील विशेष प्राविण्यासह पदवी,

(क) वरील शैक्षणिक अर्हता संपादन केल्यानंतर औषध तपासणीमधील प्रत्यक्ष अनुभव किंवा अधिनियमाच्या तरतुदींच्या अंमलबजावणीचा तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतका अनुभव :

आणखी असे की, एखाद्या उमेदवारांस या नियमाच्या उप-खंड (ब) मध्ये नमूद केलेल्या विषयाची पदव्युत्तर पदवी किंवा सिंथेसिस आणि औषध तपासणीतील संशोधनाचा अनुभव किंवा औषध उत्पादनाचा प्रत्यक्ष अनुभव असल्यास अशा उमेदवारांस प्राधान्य देता येईल.

असाधारण शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही असतील अशा उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा शिथिल करता येईल.

६. पदोन्नतीद्वारे व नामनिर्देशनाद्वारे सहाय्यक आयुक्त (औषधे) या पदावर करावयाची नियुक्ती ५०:५० या प्रमाणात करण्यात येईल.

७. नामनिर्देशनाने नियुक्त केलेली व्यक्ती दोन वर्षांच्या कालावधीसाठी परिविक्षाधीन राहील.

८. पदोन्नतीने किंवा नामनिर्देशनाने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती मराठी व हिंदी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण झालेली नसेल तर किंवा तीला त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळालेली नसेल तर, त्या व्यक्तीने त्याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार या परीक्षेत उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.

९. या पदावर नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली होण्यास पात्र राहील.

१०. या पदावरील नियुक्तीसाठी निवड झालेल्या वैद्यकशास्त्राच्या स्नातकाने त्या पदावर रूज होण्यापूर्वी, त्याने आपले नाव आधीच नोंदवलेले नसेल तर महाराष्ट्र वैद्यक परिषद अधिनियम, १९६ (१९६५ चा महा. सेहेचाळीस) या अन्वये किंवा भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ (१९५६ च १०२) या अन्वये भारतीय वैद्यक नोंदवहीत त्याचे नाव आलेले नसेल तर स्वतःचे नाव अशा प्रका नोंदवून घेणे आवश्यक आहे.

११. औषधनिर्माणशास्त्रातील पदवी धारण करणाऱ्या उमेदवाराची नेमणुकीकरिता नि झाल्यास त्याने औषध व्यवसाय अधिनियम, १९४८ खाली त्याचे नाव नोंदविले नसल्यास, या पदाव हजर होण्यापूर्वी नाव नोंदविणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**जी. एम. फोपळणकर,**
शासनाचे उप सचिव.

## MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated 27th September 2002

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. RTR. 1089/405/CR-64/DRG.-1.—In exercise of the powers conferred by the proviso to Article 309 of Constitution of India and in supersession of all existing rules, orders of Instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the posts of Joint Commissioner (Drugs), Group-A, Assistant Commissioner (Drugs), Group-A and Drugs Inspector, Group-B in the Food and Drugs Administration under Medical Education and Drugs Department of the Government of Maharashtra namely :—

1. These rules may be called the Joint Commissioner (Drugs), Assistant Commissioner (Drugs) and Drugs Inspector in the Food and Drugs Administration, Maharashtra State (Recruitment) Rules, 2002.

2. In these rules, unless the context otherwise requires,—

(*a*) " Act " means the Drugs and Cosmetics Act, 1940 ;

(*b*) " Control Act of 1940 " means the Drugs and Cosmetics Act, 1940 ;

(*c*) " Control Act of 1956 " means the Indian Medical Council Act, 1956 (102 of 1956) ;

(*d*) " Commission " means the Maharashtra Public Service Commission ;

(*e*) " Food and Drugs Administration " means the Food and Drugs Administration of Government ;

(*f*) " Commissioner " means the Commissioner, Food and Drugs Administration ;

(*g*) " Government " means the Government of Maharashtra.

3. Appointment to the post of Joint Commissiomer (Drugs) in the Food and Drugs Administration shall be made,—

by promotion of a suitable person on the basis of seniority-*cum*-merit from amongst the persons holding the post of Assistant Commissioner (Drugs) or Technical officer (Allopathic) in the Food and Drugs Administration having not less than three years regular service in that post.

4. Appointment to the post of Assistant Commissioner (Drugs) in the Food and Drugs Administration, shall be made either :—

(*A*) by promotion of a suitable person, on the basis of seniority-*cum*-merit from amongst the persons holding the post of Drugs Inspector in the Food and Drugs Administration, having not less than three years regular service in that post ; or

(*B*) by nomination from amongst the candidates who,—

(*a*) unless already in the service of Government, are not more than 40 years of age and

(*b*) possess qualification and experience prescribed for as under—

(*i*) degree in Pharmacy or Pharmaceutical Chemistry or Medicine with specialisation in Clinical Pharmacology or Microbiology from a University established in India by Law ; and

(*ii*) experience gained after acquiring above qualification in the manufacture or testing of drugs or enforcement of the provisions of the act for a minimum period of five years, and

(*c*) have adequate knowledge of Marathi so as to be able to speak, read write Marathi with facility :

Provided that, preference may be given to candidates having a post-graduate degree in any one of the subjects mentioned in sub-clause (b) (i) of clause (B) of this rule, or degree in law or research experience in the synthesis and testing of drugs or practical experience in the manufacture of drugs or both :

Provided further that, the age limit may be relaxed in the case of candidates who possess exceptional qualification or experience or both.

5. Appointment to the post of Drugs Inspector, in the Food and Drugs Administration shall be made :—

by nomination from amongst the candidates who,—

(*a*) unless already in the service of Government are not more than 35 years of age ;

(*b*) a degree in Pharmacy or Pharmaceutical Chemistry or Medicine with specialisation in Clinical Pharmacology or Microbiology from a University established in India by Law ;

(*c*) possess practical experience gained after acquiring above qualification in the manufacture or testing of drugs or enforcement of the provisions of the Act for a period of not less that three years :

Provided further that, preference may be given to candidates having a post-graduate degree in the subject mentioned in sub-clause (b) of this rule or research experience in the synthesis and testing of drugs or practical experience in the manufacture of drugs :

Provided further that, the age limit may be relaxed in the case of candidates who possess exceptional qualification or experience or both.

6. Appointment to the post of Assistant Commissioner (Drugs) by promotion and nomination shall be made in the ratio of 50 : 50.

7. A person appointed to the post by nomination shall be on probation for a period of two years.

8. A person appointed to the post shall be required to pass the examination in Hindi and Marathi according to the rules made in that behalf, unless he has already passed or exempted from passing these examinations.

9. A person appointed to the post shall be liable for transfer anywhere in the State of Maharashtra.

10. A Medical graduate selected for appointment to the post, shall be required to got himself registered under the Maharashtra Medical Council Act, 1965 (Mah. XLVI of 1965) before joining the post, unless he has already so registered or his name is borne in the Indian Medical Register maintained under the Indian Medical Council Act, 1956 (102 of 1956).

11. A Pharmacy graduate selected for appointment to the post shall be required to got himself registered under the Pharmacy Act, 1948 before joining the post, unless he has already so registered.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

G. M. PHOPLANKAR,
Deputy Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

## वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ सप्टेंबर २००७

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक आरटीआर. १३८९/प्र. क्र. ६४/८९/औषधे-१.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाच्या अखत्यारीतील अन्न व औषध प्रशासनातील सह आयुक्त (औषधे), गट अ, सहायक आयुक्त (औषधे), गट अ आणि औषध निरीक्षक, गट ब या पदांचे (सेवाप्रवेश) नियम, २००२ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांमधील सह आयुक्त (औषधे), गट अ, सहायक आयुक्त (औषधे), गट अ आणि औषध निरीक्षक, गट ब या पदांचे (सेवाप्रवेश) (पहिली सुधारणा) नियम, २००७ असे संबोधण्यात यावे.

२. अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांमधील सह आयुक्त (औषधे), गट अ, सहायक आयुक्त (औषधे), गट अ आणि औषध निरीक्षक, गट ब या पदांचे सेवाप्रवेश नियम, २००२ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "मुख्य नियम" असा करण्यात आला आहे) मधील नियम क्रमांक ४ (ब)(ब) च्या खंड (एक) मधील "औषध निर्माणशास्त्र किंवा औषध निर्माणविषयक रसायनशास्त्र यातील पदवी अथवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यकशास्त्र किंवा सूक्ष्मजीवशास्त्र यांतील विशेष प्राविण्यासह पदवी" या ऐवजी "औषध निर्माणशास्त्र किंवा औषधनिर्माण विद्याविषयक रसायनशास्त्र यातील पदवी अथवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची चिकित्सालयीन औषधशास्त्र किंवा सूक्ष्मजीवशास्त्र यातील विशेष प्राविण्यासह औषधवैद्यकशास्त्रातील पदवी" असे वाचण्यात यावे.

३. मूळ नियमातील नियम क्रमांक ४ (ब)(ब) च्या खंड (दोन) मधील "औषध तयार करणे किंवा औषध तपासणी" या शब्दांऐवजी "औषध उत्पादन किंवा चाचणी" हे शब्द वाचण्यात यावे.

४. मूळ नियमाच्या नियम क्रमांक ४ (क) खालील परंतुकामधील "किंवा औषध उत्पादनाचा प्रत्यक्ष अनुभव" हे शब्द वगळण्यात यावेत.

५. मूळ नियमातील नियम क्रमांक ५ (ब) मधील " औषध निर्माणशास्त्र किंवा औषध निर्माणविषयक रसायनशास्त्र यांतील पदवी अथवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यकशास्त्र किंवा सूक्ष्मजीवशास्त्र यातील विशेष प्राविण्यासह पदवी " याऐवजी " औषध निर्माणशास्त्र किंवा औषध निर्माण विद्याविषयक रसायनशास्त्र यातील पदवी अथवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची चिकित्सालयीन औषधशास्त्र किंवा सूक्ष्मजीवशास्त्र यातील विशेष प्राविण्यासह औषध वैधकशास्त्रातील पदवी " असे वाचण्यात यावे.

६. मूळ नियमातील नियम क्रमांक ५ (क) मधील " औषध तपासणीमधील " या शब्दांऐवजी " औषध उत्पादन किंवा चाचणी क्षेत्रातील " हे शब्द वाचण्यात यावे.

७. मूळ नियमातील नियम क्रमांक ५ (क) खालील परंतुकामधील " आणखी असे की, एखाद्या उमेदवारास या नियमाच्या उप-खंड (ब) मध्ये नमूद केलेल्या विषयाची पदव्युत्तर पदवी किंवा सिंथेसिस आणि औषध तपासणीतील संशोधनाचा अनुभव किंवा औषध उत्पादनाचा प्रत्यक्ष अनुभव असल्यास अशा उमेदवारांस प्रधान्य देता येईल " या मजकुराऐवजी " आणखी असे की, या नियमाच्या उप-खंड (ब) मध्ये नमूद केलेल्या विषयाची पदव्युत्तर पदवी किंवा सिंथेसिस आणि औषध तपासणीतील संशोधनाचा अनुभव असल्यास अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल " असे वाचण्यात यावे.

८. मुख्य नियमांच्या नियम ११ नंतर पुढील नियमाचा समावेश करण्यात यावा ----

" १२. नियम ३, ४ आणि ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्त केलेल्या व्यक्तींनी, शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेले संगणक हाताळणीसंबंधीचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. "

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**कि. व. जाधव,**
शासनाचे उप सचिव.

## MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 27th September 2007

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. RTR. 1389/C.R. 64/89/DRUGS-1.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Joint Commissioner (Drugs), Group-A, Assistant Commissioner (Drugs), Group-A, and Drugs Inspector, Group-B in the Food and Drugs Administration, under the Medical Education and Drugs Department of the Government of Maharashtra (Recruitment Rules), 2002, as follows :—

1. These rules may be called the Joint Commissioner (Drugs), Group-A, Asistant Commisioner (Drugs), Group-A and Drugs Inspector, Group-B in the Food and Drugs Administration, under the Medical Education and Drugs Department of the Government of Maharashtra (Recruitment) (First amendment) Rules, 2007.

2. In the preamble of the Joint Commissioner (Drugs), Group-A, Assistant Commissioner (Drugs), Group-A and Drugs Inspector, Group-B in the Food and Drugs Administration of the Government of Maharashtra (Recruitment) Rules, 2002 (hereinafter referred to as "the Principal Rules") for the words "orders of Instruments", the words "orders or instruments", shall be substituted.

3. In rule 4 of the Principal Rules, in the proviso, the words "or practical experience in the manufacture of drugs" shall be deleted.

4. In the rule 5 of the Principal Rules :—

(*i*) in clause (*b*)

(*a*) for the words "a degree in Pharmacy or" the words "possess a degree in Pharmacy or" shall be substituted.

(*b*) at the end of the clause, after the words "by Law" the word "and " shall be added ;

(*ii*) in the proviso to clause (*c*), the words " or practical experiance in the manufacture of drugs " shall be deleted.

5. After rule 11 of the principal rules, the following rule shall be added, namely :—

" 12. Persons appointed to the posts mentioned in rules 3, 4 and 5 shall posses a certificate in computer operation prescribed by the Directorate of Information and Technology of the Government, from time to time."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

K. V. JADHAV,

Deputy Secretary to Government.